पत्रकारितेचे मूल्य जतन करणारे वृत्तपत्र...

साप्ताहिक

# न्यायस्वातंत्र्य समता

संपादक : रमेश अ. शेळके    कार्यकारी संपादक-ॲड.चंद्रकांत गायकवाड    RNI NO. : MAHARAR/ 2010 / 36016

वर्ष – ५    अंक ४५ वा    सोमवार दि. ७ डिसेंबर ते १३ डिसेंबर २०१५    पुणे    किंमत – २ रुपये    पाने ४

## तीन शेतकऱ्यांनी विकली किडनी, सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी!

नागपूर- सावकाराकडून घेतलेले कर्ज फेडण्यासाठी तीन शेतक-यांनी आपली किडनी विकल्याचा धक्कादायक प्रकार उजेडात आला आहे. अकोल्यातील संतोष गवळी या तरुणाची श्रीलंकेत किडनी काढून विकल्याची घटना बुधवारी उजेडात आली.

त्यानंतर आणखी दोघांबाबत असे घडल्याचे समोर आल्याने किडनी विक्रीची जागतिक टोळी या मागे असावी, हा पोलिसांचा संशय बळावला आहे.

सात-आठ महिन्यांपूर्वी अकोल्याच्या संतोषने आनंद जाधव या व्यक्तीकडून २० हजार रुपये उधार घेतले होते. हप्त्याने ते फेडणे त्याला कठीण झाले तेव्हा आनंद जाधव याने त्याला कर्ज फेडायचा सोपा मार्ग सांगितला. कर्जमुक्तीच्या आशेने संतोष तयार झाला. तेव्हा आनंदने त्याची गाठ देवेंद्र शिरसाट नावाच्या व्यक्तीशी घालून दिली.

देवेंद्र त्याला नागपूरला एका खासगी दवाखान्यात घेऊन गेला. इथे एका मध्यस्थाच्या मार्फत एका दलालाशी चार लाख रुपयांत सौदा ठरला. त्यानंतर १५ दिवसांनी त्याला कोलंबो येथे नेऊन शस्त्रक्रिया करण्यात आली. मात्र, नंतर त्याच्या हाती केवळ तीन लाख रुपये ठेवण्यात आले. त्यामुळे संतोषने पोलिसांत तक्रार केली. त्यानंतर हे प्रकरण उघडकीस आले.

पोलिसांनी या प्रकरणी शिरसाट आणि आनंद जाधव यांना ताब्यात घेतले. तपासात आणखी दोन प्रकरणे उजेडात आली. यातली एक व्यक्ती महिला आहे. शांताबाई खरात नावाच्या महिलेवर ३० हजार रुपयांचे कर्ज होते. त्यांना चार लाख रुपये देण्याचे कबूल केले होते. पण फक्त दोन लाख रुपयेच मिळाले.

देवानंद कोमलकर याच्यावर एक लाख रुपयाचे कर्ज होते. त्याला आठ लाख देण्याचे कबूल केले होते. पण निम्मेच पैसे दिले. या दोघांच्या शस्त्रक्रिया मराठवाडयात केल्याची माहिती आहे. या टोळीने आणखीही काही लोकांना फसवले असण्याचा संशय असून पोलिसांनी तपास वाढवला आहे.

0-0-0

## जिल्ह्यातील ८० हजार ट्रक भंगारात

पुणे : केंद्र शासनाने वाढते प्रदूषण रोखण्यासाठी १५ वर्षे जुने ट्रक भंगारात काढण्याचा निर्णय घेतल्याने पुणे जिल्ह्यातील तब्बल ८० हजार ट्रक भंगारात निघणार आहेत. पुढील वर्षी १ एप्रिल पासून या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याने ऑल इंडिया मोटार ट्रान्सपोर्ट असोसिएशनने या निर्णयाचा निषेध केला असून, हा निर्णय तातडीने मागे घेण्याची मागणी केली. याबाबत निर्णय झाल्यास तीव्र आंदोलन उभारण्याचा इशारा संघटनेचे व्यवस्थापकीय सदस्य बाबा शिंदे यांनी दिला आहे.

देशातील शहरांमधील हवेची स्थिती गंभीर बनल्याने त्यात प्रामुख्याने जुन्या वाहनांचा समावेश असल्याने १५ वर्षाहून अधिक जुनी व्यापारी वाहने येत्या १ एप्रिलला बंद करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे. त्याची अधिकृत सूचना येत्या १० दिवसांत काढली जाणार आहे. मात्र, या निर्णयाचा फटका पुणे जिल्ह्यातील वाहतूक व्यावसायिकांना मोठ्या प्रमाणात बसण्याची शक्यता आहे. देशभरात २७ लाख ट्रक १५ वर्षाहून जुने आहेत. त्यापैकी जवळपास ८० ते ९० हजार ट्रक एकट्या पुणे जिल्ह्यात आहेत. त्यामुळे मालवाहतूकदारांमध्ये नाराजी आहे. प्रत्यक्षात या वाहनांचे आयुर्मान ठरविण्यासाठी ऑल इंडिया मोटार ट्रान्सपोर्ट असोसिएशन आणि आणि केंद-शासनामध्ये गेल्या पाच वर्षापासून चर्चा सुरू आहे. त्यावर अद्याप निर्णय झालेला नसतानाच केंद्राकडून हा निर्णय जाहीर करण्यात आल्याने मालवाहतूकदारांमध्ये खळबळ उडाली आहे.

जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने वाळू, साखर, गूळ, तसेच भाजीपाला, ऊस आणि डबर वाहतुकीसाठी जुनी वाहने मोठ्या प्रमाणात वापरली जातात. ती लोकल वाहतुकीसाठी म्हणजेच २० ते ४० किलोमीटरच्या वाहतुकीसाठी वापरली जातात. केंद्र शासनाचा निर्णय मोठ्या शहरांच्या प्रदूषणाची निगडित आहे. तर ही मालवाहतूक प्रामुख्याने आंतरजिल्हा होते शहरात नाही. त्यामुळे ही वाहने भंगारात निघाल्यास हजारो कामगारांवर उपासमारीची वेळ येणार आहे.

## राज्यघटनेच्या प्रारंभीच भारतीयांना आत्मजागृतीची जाणीव डॉ.आंबेडकरांनी करुन दिली -डॉ.कसबे

पुणे : हा देश आपला आहे; आपण या देशाचे काही तरी लागतो, ही आत्मजागृतीची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेच्या सरनाम्याच्या पहिल्याच वाक्यातील आम्ही भारताचे लोक...' या शब्दांद्वारे सर्व भारतीयांना करुन दिली, असे गौरवोद्गार ज्येष्ठ विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे यांनी आज काढले.




क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या १२५ व्या पुण्यतिथी निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्यावतीने (बार्टी) येथील पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभागृहात आयोजित एक दिवसीय परिसंवादाच्या पहिल्या सत्रामध्ये ते बोलत होते. ८४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष उत्तम कांबळे, राज्य अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष पत्रकार यदू जोशी, बार्टीचे महासंचालक डी. आर. परिहार आदी याप्रसंगी उपस्थित होते.

महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकरांनी सतत समतावादी विचार केला असे सांगून डॉ. कसबे म्हणाले, डॉ.आंबेडकरांनी आपल्या या गुरूचे विचार सार्वजनिक जीवनात अंमलात येण्यासाठी प्रयत्न केले. डॉ. आंबेडकरांच्या ज्ञानावर, संपूर्ण देशाविषयीच्या तळमळीवर प्रभावी होऊन त्यांच्यावर राज्यघटना निर्मितीची जबाबदारी महात्मा गांधींच्या सूचनेनुसार त्यावेळी टाकण्यात आली. डॉ. आंबेडकरांच्या घटना परिषदेतील समावेशाची पार्श्वभूमी यावेळी डॉ. कसबे यांनी विषद केली.

पंडीत जवाहरलाल नेहरुंनी मांडलेल्या उद्देशपत्रिकेवरुन भारतीय राज्यघटनेचा सरनामा डॉ. आंबेडकर यांनी तयार केला. यामध्ये भारत हे एक सार्वभौम, लोकशाही, धर्मनिरपेक्ष, प्रजासत्ताक, गणराज्य निर्माण केले म्हणजे काय केले हे डॉ. कसबे यांनी विविध उदाहरणांद्वारे स्पष्ट केले. जगातील इतर कुठल्याही स्त्रीयांना मतदानाचा अधिकार मिळविण्यासाठी चळवळी उभाराव्या लागल्या, संघर्ष करावा लागला. मात्र डॉ. आंबेडकरांनी राज्यघटनेतच स्त्रीयांना मताचा अधिकार देऊन सर्वसमानता निर्माण करण्यासाठी पाऊल उचलले. आपल्या ऐहिक जीवनातील प्रश्नांचा धर्माशी संबंध जोडता कामा नये. तुमच्या श्रद्धा, समजुती तुम्ही तुमच्या घरातच व तुमच्यापुरत्याच ठेवाव्यात. देशातील कोणतेही आर्थिक, राजकीय, सामाजिक व अन्य प्रश्न, समस्या राज्यघटनेच्याच आधारे सोडविण्यात येतील, अशी स्पष्ट ग्वाही राज्यघटनेने दिली आहे. प्रत्येक माणसाला त्याच्या कामाप्रमाणे दाम देण्याचं आश्वासन समाजवाद या शब्दाने दिले आहे, असेही डॉ. कसबे म्हणाले.

यदू जोशी म्हणाले की, आंबेडकरवाद, गांधीवाद तसेच सावरकरवाद हे तीन मुख्य विचारप्रवाह अभ्यासले तर त्या तिन्हीचेही उद्गाते महात्मा फुले यांना गुरुस्थानी माननारे आहेत हे लक्षात येते. फुल्यांनी त्यांच्या काळात समाजात सहिष्णूता राखण्यासाठी मोलाचे प्रयत्न केले. ते कोणत्याही एकाच जाती, धर्माच्या विरोधात नव्हते तर त्यांचा विरोध असमानतेला होता. त्यांचा विरोध ब्राह्मणांना नव्हता तर ब्राह्मण्याला होता. फुल्यांनी महिलांच्या उत्थानासाठी प्रचंड मोठे काम करुन ठेवले आहे. स्री शिक्षणाची सुरुवात, विधवा पुनर्विवाहाला उत्तेजना आदी अनेक बाबींमधून महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. डॉ. आंबेडकरांनीही तोच कित्ता पुढे चालू ठेवला. आताच्या काळात विविध शासकीय योजना तळागाळात पोहोचवायच्या असतील तर आंबेडरवादी विचारांचा वारसा चालविणारी फळी निर्माण झाली पाहिजे, असेही ते म्हणाले.

बार्टीचे प्राध्यापक बी. टी. मुळे यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक बार्टीचे महासंचालक परिहार यांनी केले. प्रारंभी महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करुन आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी बार्टीचे मुख्य प्रकल्प संचालक वसंत रामटेके, समाजकल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त विजया पवार, उपायुक्त श्री. बच्छाव आदींसह राज्यातून आलेले समतादूत मोठ्या संख्येने उपस्थित होते.

0-0-0

# संपादकीय...

## महागाई

महागाईच्या मुद्यावर सत्तेतील घटक पक्ष शिवसेनेने दंड थोपटले असल्याचे दिसून येते. आमची बांधिलकी सत्तेशी नसून जनतेशी आहे. अशी आरोळी ठोकत, मित्रपक्षाला रस्त्यावर उतरून जाब विचारताना शिवसैनिक दिसत आहेत. सत्ता स्थापनेपासून शिवसेनेला दुय्यम वागणुक मिळत असल्याची सल त्यांच्या मनात आहे.

शिवसेनेचे धोरण ८०% समाजकारण व २०% राजकारण असे आहे. स्थापनेपासून यतकिंचितही बदल न झाल्याचे दिसुन येते. २०% राजकारण करत शिवसेनेने एकदा पुर्ण वेळ सत्ता भोगली, यंदा त्यांचे खासदार विक्रमी मतांनी निवडून येऊन देशाच्या राजकारणात सक्रिय झाले. असले तरी, महाराष्ट्रात या वेळी त्यांना सत्तेत स्वबळावर येता आले नाही. दुय्यम मिळालेली खाती, छोटा भाऊ म्हणून महाराष्ट्रात मिरवणारा मित्र अचानक मोदी लाटे मुळे, सत्तेत जाऊन बसल्याने या पक्षाची गोची झाल्याचे दिसते. विरोधकांना नगण्य स्थान असून ही, मतमोजणी सुरू असताना शरद पवार साहेबांनी बिनशर्त पांठींबा देण्याची घोषणा करून, शिवसेनेचे सत्तेवर अंकुश ठेवणचे मनसुबे उधळल्याचे दिसते.

आमचे सरकार स्थिर आहे आणि आपला कार्यकाल बिनविरोध, बिनबोभाट पुर्ण करेल असे वक्तव्य महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना प्रसारमाध्यमांसमोर वारंवार करावे लागते. ते केवळ शिवसेनेमुळेच.

महाराष्ट्रात पडलेला भिषण दुष्काळ, संपुर्ण राज्यांत पिण्याच्या पाण्यासाठी करावी लागणारी वणवण, त्यामुळे जनता हवालदिल झालेली दिसते. सर्वसामान्य जनतेला यंदा दिवाळी साध्या पणाने साजरी करावी लागली. डाळीचे भाव गगनाला भिडल्याने सर्वसामान्यांचे वरण-भात खाणे ही मुश्किल झाल्याचे दिसुन येते.

नुकत्याच बिहारच्या निवडणुकांचे निकाल लागले नितिशकुमार यांनी बहुमतातले सरकार स्थापन करून बीजेपीला हादरा दिला. बिहारच्या निकालावर प्रतिक्रिया देताना संजय राऊत यांनी या क्षणाला जर महाराष्ट्रात निवडणूका झाल्या तर शिवसेना बहुमतांनी स्वबळावर निवडूण येण्याचा विश्वास दाखविला.

विरोधी पक्षांनी महागाई सारख्या मुद्यांवर सत्ताधाऱ्यांना घेरणे आवश्कयक असताना सत्तेतील पक्षच रस्त्यावर लढाई लढू लागल्याने जनता चकीत झाल्याचे दिसते. आपले प्रश्न कोणासमोर मांडायचे हा प्रश्न सर्व सामान्य जनतेला नक्की पडेल. शिवसेनेच्या माध्यमातून का होईना लोकांच्या मनातील वेदना आंदोलनातुन व्यक्त होताना दिसते हे महत्वाचे दोन्ही पक्ष एकत्र बसुन यावर तोडगा काढतील की नाही हे पहाणे औत्सुक्याचे ठरेल.

न्यायस्वातंत्र्य समता हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक रमेश अभिमन्यू शेळके यांनी यश एन्टरप्राईजेस डी १४ साई सयाजीनगर वारजे, पुणे-४११ ०५८ येथे छापून सर्व्हे नं.४/१२ महात्मा फुले वसाहत कोंढवा खुर्द, कमेला पुणे-४११ ०४८ येथून प्रकाशित केले.

(या अंकामध्ये छापलेल्या मजकुरांशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. वादविवाद पुणे न्यायकक्षेत)

# भारतीय लोकशाहीसाठी धोक्याची घंटा

लोकनीती-सीएसडीएस'ने अलीकडेच एक सर्वेक्षण केले. संसदीय निवडणुकांच्या यशासाठी चांगले निर्णय टाळले जातात. त्याऐवजी योग्य ते निर्णय घेण्याचे काम एखाद्या मजबूत नेत्याकडे सोपवले पाहिजे, असा प्रस्ताव सर्वेक्षणासाठी ठेवला गेला. त्या प्रस्तावावर आपले मत नोंदवणाऱ्यांपैकी सुमारे ३९ टक्के लोकांनी प्रस्तावाचे समर्थन केले. याच प्रस्तावात मजबूत नेता'ऐवजी सेना' आणि विशेषज्ञ' या पर्यायांबाबत विचारलेल्या प्रश्नावरसुद्धा जवळपास इतक्याच लोकांनी प्रस्तावाच्या बाजूने मत दिले होते. ही आकडेवारी बातम्या बनल्या खऱ्या, परंतु माध्यमांनी या विषयाला फारसे महत्त्व दिले नाही. राजकीय पक्षांना त्यावर कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त करणे गरजेचे वाटले नाही. माध्यमे आणि राजकीय पक्षांकडून झालेल्या उपेक्षेचे कारण कोणतेही असो, परंतु देशात लोकशाही व्यवस्थेबद्दल एकप्रकारची उदासीनता आढळते. तरी निदान ३९ टक्के लोक या समस्येचा विचार करत आहेत ही समाधानाची बाब आहे. विभिन्न राज्यांत होणाऱ्या निवडणुकीत मतदान करण्याचा लोकांचा उत्साह कमी झालेला नाही. देशाच्या लोकशाही राजवटीत विशेषतः संसद आणि विधानसभांमध्ये ज्या तर्हेचे कामकाज चालवले जाते ते पाहता जनसामान्यांत एकप्रकारे निराशेची भावना मात्र जाणवते. संसदेचे हिवाळी अधिवेशन नुकतेच सुरू झाले. लोकसभेत सरकारकडे पुरेसे बहुमत आहे, परंतु राज्यसभेतील स्थिती सरकारच्या बाजूने नाही. राज्यांतील निवडणूक निकाल ही स्थिती बदलायला उपयुक्त ठरेल, अशी भाजपप्रणीत सरकारला आशा होती. परंतु बिहार निवडणूक निकालांनी ती धुळीस मिळवली आहे. पावसाळी अधिवेशनात जे मुद्दे सरकारसमोर होते तेच आता हिवाळी अधिवेशनात आहेत. शिवाय परिस्थितीसुद्धा बदललेली नाही. त्यामुळे चालू सत्रसुद्धा सावळागोंधळात भरडले जाणार का, अशी शंका स्वाभाविक आहे. संसदेचे मागील सत्र इतिहासात सर्वात कमी कामकाजाचे ठरले. राज्यसभेत एकही गैरवित्तीय विधेयक मंजूर होऊ शकले नाही. लोकसभेत केवळ ८ विधेयके मंजूर झाली होती. उपलब्ध आकडेवारीनुसार लोकसभेच्या निर्धारित वेळेपेक्षा अर्ध्याहून कमी काळ कामकाज झाले. राज्यसभेचे कामकाज केवळ ९ टक्क्यांपर्यंत सीमित राहिले. संसदेचे कामकाज यापूर्वी कधीही बाधित झाले नाही असे नाही. जो पक्ष विरोधात तेव्हा होता त्याने सभागृहाच्या कामकाजात अडथळ्याची एकही संधी सोडली नव्हती. २०१० मध्ये भाजपमुळे राज्यसभेत निर्धारित काळात केवळ २ टक्के इतकेच काम होऊ शकले होते. त्यादृष्टीने पाहता मागील सत्रात काँग्रेसने एकप्रकारे त्याचा बदलाच घेतला आहे. आधी भाजप आणि आता काँग्रेसने सभागृहाचे कामकाज चालू दिले नाही. देशातील राजकीय पक्षांचे प्राधान्य त्यांचे व्यक्तिगत स्वार्थच निश्चित करत असतात हेच त्यातून त्या त्या पक्षांनी दाखवून दिले. राजकीय पक्ष व्यक्तिगत स्वार्थालाच देशहित मानतात, हेच त्यातून स्पष्ट झाले. राजकीय पक्षांच्या या मानसिकतेमुळे देशातील नागरिकांत लोकशाहीसंबंधी उदासीनता वाढीस लागली आहे. ही उदासीनता हळूहळू निराशेत बदलते. अशा प्रकारची निराशा कोणत्याही शासनप्रणालीसाठी धोक्याचा इशाराच असते. लोकनीती'ने केलेल्या सर्वेक्षणाचा हवाला सुरुवातीला दिला गेला. तोसुद्धा एकप्रकारचा सावधगिरीचा इशाराच आहे. दुर्दैवाने या घंटेचा आवाज ऐकण्यासदेखील राजकीय नेतृत्व राजी दिसत नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुमारे सात दशके देशाने लोकशाही व्यवस्था टिकवून ठेवली, हेही तितकेच खरे! संपूर्ण दक्षिण आशियात एक मजबूत लोकशाही टिकवल्याचे भारताने दाखवून दिले आहे. परंतु यादरम्यान भारतीय लोकशाही व्यवस्थेला कमकुवत करणाऱ्या बऱ्याच अयोग्य घटना घडल्या आहेत. ही वस्तुस्थिती कशी नाकारणार? अशी घटना लोकशाही व्यवस्थेबद्दलचा जनतेचा विश्वासही कमकुवत करतात. लोकशाही व्यवस्थेवरील विश्वासाबाबतच्या सर्वेक्षणात ३९ टक्के लोकांनी संसदीय पद्धतीबद्दल निराशा प्रकट करणे हा एक गंभीर इशारा आहे. हा असंतोष अकारण नाही. संसदेत मागील सत्रादरम्यान कामकाजात वारंवार अडथळे आणले गेले व कामकाज होऊ दिले गेले नाही. त्यामुळे जनतेत निराशेची भावना वाढीस लागणे साहजिक आहे. प्रश्न फक्त सभागृहात काम न होण्याचा नाही तर सतत होणाऱ्या संसदीय अवनतीचासुद्धा आहे. याचे एक उदाहरण मंत्रिमंडळाची काम करण्याची पद्धत आहे. भारतीय लोकशाही व्यवस्थेनुसार पंतप्रधान ज्या मंत्रिमंडळाचा प्रमुख असतो तो सामूहिक रूपाने संसदेला जबाबदार असतो. प्रत्येक मंत्रीदेखील संसदेप्रती आपली जबाबदारी निभावतो. पूर्वीसुद्धा पंतप्रधान सामुदायिक जबाबदारीच्या नावावर आपल्या हातात विशेषाधिकार ठेवण्याचा प्रयत्न करत आले आहेत, परंतु आताच्या शासन काळात ही प्रवृत्ती काहीशी अधिकच एकवटली आहे. एकीकडे मंत्रिमंडळ हे पंतप्रधान कार्यालयात सामावताना दिसत आहे तर दुसऱ्या बाजूला संसदेचे महत्त्वही कमी होत आहे. पंतप्रधानांची संसदेतील कमी उपस्थिती हासुद्धा एका अर्थी संसदेचा अपमानच ठरतो. अध्यादेशांच्या माध्यमातून सरकार चालवण्याचे होणारे प्रयत्न राज्यघटनेविरुद्ध नसले तरीही संसदीय व्यवस्थेला कमकुवत करणारे ठरत आहेत. मागील एका वर्षात नव्या सरकारने १४ अध्यादेश काढले. मनमोहनसिंग यांच्या यूपीए-२ च्या सरकारने वर्षाला सरासरी ४ अध्यादेश काढले होते. राज्यसभेत बहुमत नसल्याने सरकारला अध्यादेशाचा आधार घ्यावा लागतो हे खरे, परंतु त्यामुळे संसदीय व्यवस्थेवरचा जनतेचा विश्वास घटू लागला आहे, ही बाब दुर्लक्षिता येईल का? चर्चा आणि विचारविनिमयाने निर्णय घेणे हे लोकशाही पद्धतीचे मर्म! मात्र सरकार तसे करताना दिसत नाही. विरोधकसुद्धा तसे करू देत नाहीत. गतिरोधाची ही स्थिती संपुष्टात यायला हवी. एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करून सरकार आणि विरोधक जाणते-अजाणतेपणे जनतेच्या आस्थेला इजा पोहोचवत आहेत. त्याचा परिणाम म्हणून जनतेला एखादा मजबूत शासनकर्ता, सेना वा विशेषज्ञाची गरज वाटू लागली आहे. ही धोक्याची घंटा आहे, हे पुन्हा सांगावेसे वाटते. त्या घंटेचा आवाज दुर्लक्षित करणे म्हणजे ज्या फांदीवर आपण बसलो आहोत तीच फांदी कापण्यासारखे ठरेल. म्हणून सर्वच पक्षांनी याविषयी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. व्यक्तिगत स्वार्थ सोडून संसदीय प्रणालीला मजबूत करण्याचा प्रयत्न व्हायला हवा. कमी संख्येच्या विरोधकांना कुचकामी समजून सरकार आपला अहंकार कुरवाळू शकते. परंतु त्यामुळे लोकशाही व्यवस्थेला कमीपणा येतो. संसदीय व्यवस्थेत अविश्वास वाढू लागल्यास त्याला सत्तारूढ पक्ष आणि विरोधक दोघेही जबाबदार ठरतील.परंतु आपल्या वर्तनामुळे लोकशाहीविरोधी संकेत मिळू नयेत याबद्दलची सर्वाधिक जबाबदारी पंतप्रधानांवर आहे. मात्र सरकार हे समजून घेण्यास तयार आहे का?

# शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी हवी

## काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे यांची मागणी

नागपूर : राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडल्याने राज्यातील शेतकरी अडचणीत सापडला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना संपूर्ण कर्ज माफी हवी आहे. हा विषय काँग्रेसतर्फे सभागृहात लावून धरण्यात येईल, अशी माहिती काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे यांनी दिली.

ठाकरे हे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष असताना आमदारांचा घोळका त्यांच्या सभोवती असायचा; परंतु पद जाताच एकही आमदार त्यांच्यासोबत नसल्याचे चित्र आज विधानभवन परिसरात बघायला मिळाले.

पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, गेल्या तीन-चार वर्षापासून अपुरा पाऊस पडत आहे. त्यामुळे सतत नापिकी येत असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी आत्महत्येचे प्रमाणही वाढले आहे. राज्य शासन ठोस उपाययोजना करीत नाही. दुष्काळ, शेतकरी आत्महत्या हे प्रश्न आ वासून उभे आहेत. या ज्वलंत प्रश्नांवरील विरोधकांचे लक्ष विचलित करण्यासाठी वेगळ्या विदर्भाचा मुद्दा अचानक पुढे केला जात आहे. राज्याचे महाधिवक्ता ॲड. श्रीहरी अणे यांनी वेगळ्या विदर्भाच्या मुद्यावर सरकारने जनमत चाचणी घ्यावी, असे मत व्यक्त करून वादाला तोंड फोडले आहे. त्यामुळे मूळ विषय बाजूला पडत आहेत. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे भाजपा-सेना दुर्लक्ष करून राजकारण करीत आहेत. हा शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार असल्याचे ठाकरे यांनी स्पष्ट केले.

कापूस, धान, संत्रा, सोयाबीन, कांदा आदी पिकाला योग्य भाव मिळावा, राज्यातील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी, ही आमची मागणी असून विरोधी पक्ष म्हणून हा विषय आम्ही सभागृहात लावून धरणार आहोत. विरोधी पक्षांची भूमिका यशस्वीपणे बजावू, असा निर्धारही ठाकरे यांनी व्यक्त केला.

# डेंग्यू रोखण्यासाठी जनजागृती आवश्यक- राजन नारिंग्रेकर

राज्यात विविध ठिकाणी डेंग्यू या आजाराचे रुग्ण आढळत आहेत. या आजाराविषयी जनजागृती करण्यासाठी आणि माहिती देण्यासाठी दिलखुलास कार्यक्रमात आमंत्रित करण्यात आलं होतं बृहन्मुंबई महानगर पालिकेचे किटकनाशक अधिकारी राजन नारिंग्रेकर यांना. दि. १९ नोव्हेंबर रोजी दिलखुलास कार्यक्रमात सकाळी ७.२५ ते ७.४० यावेळेत प्रसारित झालेल्या त्यांच्या मुलाखतीचा सारांश.

प्रश्न- सध्या राज्यात मोठ्या प्रमाणावर डेंग्यू या आजाराचा प्रार्दुभाव झाल्याचं आढळत आहे. डेंग्यू फैलावण्याची कोणती कारणं सांगता येतील ?

उत्तर- डेंग्यू या आजाराचा ताप हा विषाणूंमुळे पसरतो. हा विषाणुजन्य ताप असून चार प्रकारचे विषाणू असतात, डेन वन, डेन टू, डेन थ्री आणि डेन फोर. हा विषाणुजन्य आजार असल्यामुळे औषधे, लस, इंजेक्शन उपलब्ध नसल्यामुळे डेंग्यू ताप पसरु नये याबाबत काळजी घ्यावी लागेल. एडिस डासाची उत्पत्ती होणार नाही याची काळजी घेऊन डेंग्यूचा फैलाव होणार नाही याची काळजी घ्यावी.

प्रश्न- डेंग्यू या आजाराची लागण नेमक्या कोणत्या ऋतूत होते ?

उत्तर- हा आजार पावसाळा संपत आल्यावर ते हिवाळा सुरु होताना होते. तापमान आणि आर्द्रता असणाऱ्या वातावरणात डेंग्यूचे विषाणू आढळतात. साचलेल्या पाण्यावर, उष्णता आर्द्रता पोषक असल्याने डेंग्यूचे विषाणू वाढतात.

प्रश्न- डेंग्यूची उत्पत्ती स्थाने नेमकी कोणती आहेत ?

उत्तर- डेंग्यू आणि चिकुनगुनिया पसरवणारा ईडिस इजिप्ट डास, मलेरिया पसरवणारा नाफेलिस डास, याची घराच्या अवतीभवती उत्पत्ती होते. यासाठी घरात डेंग्यूच्या डासाला उत्पत्ती स्थान उदा. झाडाच्या कुंड्यात साचलेले पाणी, एसी मधून बाहेर पडलेलं पाणी, देवापुढे ठेवलेले नारळ, कोंब आलेले नारळ, प्लास्टीकच्या भांड्यात साठवून ठेवलेले पाणी यामध्ये या डासांची उत्पत्ती होते. झोपडपट्टीत पाणी साठवून ठेवणाऱ्या ठिकाणी, ड्रम मध्ये डेंग्यूचं वसतीस्थान असतं. विहीरीत साचलेल्या पाण्यात गप्पी मासे सोडले जातात. जेणेकरुन डेंग्यूच्या अळ्या हे मासे खातात.

प्रश्न- डेंग्यू झाला आहे याची प्राथमिक लक्षणं काय सांगता येतील ?

उत्तर- डेंग्यू तापाला हाडमोडे ताप संबोधलं जातं. उदा. हाडात होणाऱ्या वेदना, अंगदुखी, काहीवेळा अंगावर पुरळ येणे ही प्राथमिक लक्षणे आहेत. ही लक्षणं जाणवल्यास प्रथम स्वतः कोणतेही औषध न घेता वैद्यकीय सल्ला घेणं खूप हितकारक असत. वैद्यकीय सल्ल्यानुसार रक्त तपासणी करणं देखील आवश्यक आहे. यानंतरच डेंग्यूचा प्रार्दुर्भाव झाला आहे की नाही हे समजते. डेंग्यूचा डास दिवसा चावतो.

प्रश्न- डेंग्यू झाल्यानंतर रुग्णांनी काय काळजी घ्यावी ?

उत्तर- डेंग्यू साठी ठोस औषध नसल्यामुळे जी लक्षणं निदर्शनास येतात त्या लक्षणांसाठी औषधोपचार करावा. आराम करणं खूप महत्त्वाचं आहे. शरिरातील पाण्याचं प्रमाण कमी होऊ देऊ नये. वैद्यकीय सल्ला आणि विविध चाचण्या करुन औषधे घ्यावी.

प्रश्न- डेंग्यू होऊ नये म्हणून काही प्रतिबंधक उपचार आहेत का ?

उत्तर- डेंग्यूवर प्रतिबंधक लस आहे, पण त्याची सर्वतोपरी चाचणी होऊन ती भारतात २०१५ पर्यंत पोहोचेल. लस वापरल्यानंतरच त्याच्या उपयुक्ते विषयी आपण बोलू शकतो.

प्रश्न- डेंग्यू या आजाराचा फैलाव रोखण्यासाठी महापालिका प्रशासनाने कोणती उपाययोजना केली आहे ?

उत्तर- डेंग्यूच्या डासाची घरात आणि घराच्या अवती-भवती उत्पत्ती होत असल्याने यासाठी जनजागृती महत्त्वाची आहे. त्यामुळे महापालिकेने, शासनाने मोठ्या प्रमाणावर नागरिकांनी कोणती काळजी घ्यावी याबाबत रेडिओ, बेस्ट बसेसच्या माध्यमातून तसेच घरोघरी पोस्टर्स वाटले जात आहेत. रेल्वे, होर्डिंग्ज, रॅली यांच्या माध्यमातून जनजागृती मोहिम हाती घेतली आहे. महानगरपालिकेचे कर्मचारी घरोघरी जाऊन डास उत्पत्ती स्थानांबाबत जनजागृती करीत आहेत. नागरिकांनी काय करावे आणि काय करु नये याच्या सूचना दिल्या जात आहेत. जेणेकरुन डेंग्यू या आजाराला आळा बसून मोठ्या प्रमाणात यश येईल अशी खात्री आहे.

-मीरा ढास, उपसंपादक

# होणार सून मी' करणार प्रेक्षकांना गुडबाय



आठ वाजले, की बाहेर गेलेल्या महिलावर्गाची तारांबळ उडते ती घरी जाण्याची! रोज रोज कसरत तारेवरची... ही धून ऐकल्याशिवाय महिलांचा दिवस पूर्ण होत नाही, असे सध्याचे चित्र आहे. होणार सून मी त्या घरची...' या मालिकेने प्रेक्षकांना अक्षरशः वेडे केले आहे. मात्र, मालिकेमध्ये श्री-जान्हवीचे पुढे काय होणार, हे जाणून घेण्याची उत्सुकता असलेल्या महिलावर्गासाठी मात्र एक बॅड न्यूज' आहे. ही मालिका लवकरच प्रेक्षकांना गुडबाय' करणार असल्याचे समजते... जान्हवीला अपत्यप्राप्ती झाल्यानंतर ही मालिका गुंडाळणार असल्याचे ऐकिवात आहे. या वृत्ताने आपले माणूस दूर गेल्यानंतर जे फिलिंग येते तशीच काहीशी अवस्था महिलांची होणार हे नक्की! मध्यमवर्गीय कुटुंबातील कथा... कलाकारांचा सहजसुंदर अभिनय या गोष्टींमुळे या मालिकेने अल्पावधीतच प्रेक्षकांच्या मनात घर केले. काहीही हं श्री' हा जान्हवीचा डायलॉग सोशल मीडियावर खूपच गाजला. त्यावरून आलेले विनोद, उखाणे यांनी मालिकेइतकेच प्रेक्षकांचे निखळ मनोरंजन केले. श्री आणि जान्हवी यांची व्यक्तिरेखा साकारणारे शशांक केतकर आणि तेजश्री प्रधान मालिका सुरू झाल्यानंतर गेल्या वर्षी विवाहबंधनात अडकले काय आणि त्यानंतर दोघं विभक्त होणार असल्याचे वृत्त येऊन थडकल्याने प्रेक्षकांमध्ये हळहळ व्यक्त करण्यात आली. इतके या मालिकेने प्रेक्षकांना आपलेसे केले.

# चहावाला ते दिग्दर्शक...

# अजित साबळेचा प्रेरणादायी प्रवास



वडाळा - सहावीत शिकत असताना अभिनयात करिअर करायची जिद्द उराशी बाळगून एका मुलाने थेट मुंबई गाठली. कामाच्या शोधात त्याला चहाच्या टपरीवर काम मिळाले. पुढे नाटकाच्या वेडाने तो इतका झपाटून गेला की अभिनेता म्हणून नावारूपालाही आला. आता चक्क त्याचा चित्रपट येतोय... कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यातील खानापूर गावात राहणाऱ्या अजित साबळे याचा चहावाला ते दिग्दर्शक असा प्रवास तरुणाईला नक्कीच प्रेरणादायी आहे.

लाखो नागरिकांची स्वप्ननगरी असलेल्या मुंबईत प्रत्येक जण काही ना काही स्वप्न उराशी बाळगून येतो. आपण पाहिलेले स्वप्न मुंबईत पाऊल ठेवल्यानंतर पूर्ण होणार... मग त्यासाठी कितीही आटापिटा करावा लागला तरी चालेल... यश आपलेच आहे, हाच उद्देश डोळ्यापुढे ठेवून अनेक जण ध्येयाने झपाटून काम करीत असतात. अजित साबळे त्यापैकीच एक उदाहरण. अजितने नामांकित १६ नाटकांत, सहा मालिकांत व पाच चित्रपटांत काम केले आहे. चार शॉर्ट फिल्म केल्यानंतर लेखक-दिग्दर्शक म्हणून तो पटरी बॉईज या पहिल्या चित्रपटाची निर्मिती करीत आहे.

चित्रपटसृष्टीबद्दलची कुठलीही पार्श्वभूमी नसणाऱ्या आणि नाटक-चित्रपटांना विरोध असणाऱ्या कुटुंबात अजयचे बालपण गेले. गावात यात्रेनिमित्त होणाऱ्या सोंगी भजनामध्ये सोंगाड्या म्हणून फार आवडीने तो काम करायचा. याच क्षेत्रात करिअर करायचे म्हणून आजरा हायस्कूलमध्ये सहावीमध्ये शिकत असतानाच कोणाचेही न ऐकता त्याने थेट मुंबई गाठली. घरची परिस्थिती, शिक्षणात न रमणारे मन व अभिनेता होण्याची जिद्द पूर्ण करण्यासाठी त्याचा संघर्ष सुरू झाला. अनेक अडचणींवर मात करत त्याने लोअर परळमध्ये एका चहाच्या टपरीवर दिवसा काम केले. रात्री सहकार नाईट शाळेत शिकत अभिनय कार्यशाळेत तो जाऊ लागला. नाटकाच्या वेडाने झपाटल्याने अल्प कालावधीतच कलासक्त म्हणून लालबाग-परळ विभागात तो प्रसिद्ध झाला. नाटक आणि चित्रपटांत कामे मिळत होती; मात्र घरच्यांचा विरोध होता. अशा वेळी श्याम राणे, नामदेव जाधव, विठोबा तेजम, विलास जाधव आदी मित्रांच्या सहकाऱ्याने आणि आधाराने पथनाट्य, एकांकिका व लोकनाट्य असा प्रवास करत त्याने संघर्ष चालूच ठेवला.

त्यानंतरच्या काळात चौकट राजा हा नवोदित कलाकारांचा संघ तयार करून नाटक आणि चित्रपट व्यवसायात त्याने पाऊल मजबूत केले. मायबोली वाहिनी, एनडी टीव्ही वाहिनी, मी मराठी, सह्याद्री, मस्ती व कलर्स वाहिनीवर अजितने अभिनय, लेखन व दिग्दर्शनाच्या कामांचा धडाका लावला. आता त्याचेच लेखन आणि दिग्दर्शन असलेल्या पटरी बॉईज चित्रपटाचे काम तो पाहत आहे. या चित्रपटासाठी मनोज पेरूनकर यांच्यासोबत तो पटकथा, संवाद व दिग्दर्शन करत आहे. हा चित्रपट हार्बर रेल्वेमार्गाच्या बाजूने असणाऱ्या झोपडपट्टीतील सहा मित्रांची कथा आहे. त्यात नव्या चेहऱ्यांसोबत काही नावाजलेले जुने चेहरेही आहेत.

अनेक सामाजिक विषय चित्रपटासारख्या प्रभावी माध्यमातून हाताळायचे असून, स्वतःची वेगळी छाप निर्माण करण्यावर भर आहे, असे अजित सांगतो. तीव्र इच्छाशक्ती आणि अथक परिश्रमाने आपले ध्येय लवकरात लवकर गाठता येते, याचे उत्तम उदाहरण अजितने घालून दिले आहे.

# सरकारकडे पिण्याच्या पाण्यासाठी निधी नाही, ही शोकांतिका!

देवगड- सर्वानीच पक्षभेद विसरुन कामाला लागण्याची गरज असून सरकारनेही पाणीटंचाईसारख्या कामांना निधी द्यावा, असे मत आमदार नितेश राणे यांनी पाणीटंचाईच्या बैठकीत मांडले.

पाणीटंचाई टाळण्यासाठी नियोजित करण्यात आलेली कामे पूर्ण होण्यासाठी योगदान देण्याची गरज आहे. ही ५० टक्के जबाबदारी अधिकाऱ्यांची असून ५० टक्के जबाबदारी लोकप्रतिनिधींची व ग्रामस्थांची आहे, हे लक्षात घेण्याची गरज आहे. प्रस्ताव पाठवले जातात, कागद रंगवले जातात, मात्र निधी मिळत नाही, ही शोकांतिका आहे. सर्वानीच पक्षभेद विसरुन कामाला लागण्याची गरज आहे. सरकारनेही पाणीटंचाईसारख्या कामांना निधी द्यावा, असे मत आमदार नितेश राणे यांनी पाणीटंचाईच्या बैठकीत मांडले.




व्यासपीठावर जिल्हा परिषद अध्यक्ष गोटय़ा उर्फ संदेश सावंत, सभापती डॉ. मनोज सारंग, उपसभापती स्मिता राणे, तहसीलदार जीवन कांबळे, गटविकास अधिकारी विजय चव्हाण, बांधकाम सभापती संजय बोंबडी, साहाय्यक गटविकास अधिकारी चंद्रशेखर जाधव, सर्व जिल्हा परिषद सदस्य, सर्व पंचायत समिती सदस्य, संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत आमदार नितेश राणे यांनी मागील वर्षी झालेल्या कामांचा आढावा घेतला. ही अपूर्ण कामे का राहिली याबाबतही सविस्तर चर्चा केली. तिर्लोट येथील कामे अपूर्ण असून; संबंधित कंत्राटदार ती पूर्ण करीत नाहीत, अशी तक्रार करण्यात आली. या पाणी योजनांचे पोटमक्तेदार घरकर ठेकेदाराला लोकप्रतिनिधीच पाठीशी घालत असल्याचे मतही संबंधितांनी व्यक्त केले. वाडापाठार व कोटकामते येथील पाणीटंचाईची कामे करावीत, लिंगडाळ येथे पाण्याची सोय करावी, देवगड-जामसंडेची भरलेली लोकवर्गणी परत मिळावी, गाळ काढण्याचे पैसे केवळ १० हजार रुपये मिळतात ते वाढवून मिळावेत, अशा विविध मागण्या करण्यात आल्या.

आमदार नितेश राणे यांनी केलेल्या जनआंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ७ कोटी ४० लाखांचा प्रस्ताव मंत्रालयात गेला असून; तो काही दिवसांत मंजूर होईल, अशी माहिती ग्रामीण पाणीपुरवठय़ाच्या अधिकाऱ्यांनी दिली. यावर आमदार नितेश राणे यांनी हे पैसे नक्की येणार ना असा प्रश्न केला. समारोपावेळी गटविकास अधिकारी विजय चव्हाण यांनी सर्व ग्रामपंचायतीचे आराखडे तयार असून या आराखडय़ांत आता सूचवलेली कामे घेऊन हा आराखडा आपण लवकरच वरिष्ठांना सादर करू, असे सांगितले. देवगड तालुक्याचा आराखडा पहिल्यांदा जाईल, असे मतही त्यांनी व्यक्त केले. या वेळी पाणीटंचाईची कामे प्राधान्यक्रमाने करा, यात चालढकल नको यासाठी कालबद्ध आराखडा तयार करा, असे मत आमदार नितेश राणे यांनी व्यक्त केले आहे.

०-०-०

## वाकड कन्या ५७/२ शाळेत चित्र कला स्पर्धा संपन्न



पिंपरी चिंचवड वाकड कन्या ५७/२ या शाळेत डोअर स्टेप यांच्या वतीने बालदिनाअंतर्गत चित्रकला स्पर्धा पहिली ते सातवी पर्यंत घेण्यात आल्या. ठसे काम, कोलाज, बिंदु जोडून चित्र काढणे, रंग भरणे, पुष्कथिम, किल्यांचे चित्र काढणे, माहिती लिहिणे वगैरे स्पर्धा घेण्यात आल्या यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सुनंदा गायकवाड तसेच त्यांचे सर्व शिक्षक, डोअरस्टेपच्या संस्थापीका रजणी परांजपे, प्रकल्प अधिकारी राजेश जाधव, विभाग समन्वयक छाया सनस, सुजाता भोसले, पर्यवेक्षीका ज्योती सोनवणे, पुस्तक परिक्षक वैशाली चौधरी यांच्या सहकार्याने चित्रकला कार्यक्रम चांगल्या प्रकारे पार पडला. विद्यार्थ्यींनी चित्रकला स्पर्धेत अत्यंत एकाग्र झाल्या होत्या. सर्वांनी छान चित्रे काढली होती. चित्रकला स्पर्धेत भाग घेणाऱ्या सर्व विद्यार्थीनींना बक्षिसे देण्यांत आली.

## अण्णाभाऊ साठे महामंडळावर अखेर आयएएसची नियुक्ती

पुणे : ३८५ कोटी रुपयांच्या महाघोटाळ्यात अडकलेल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकपदाचा अतिरिक्त कार्यभार आज आयएएस अधिकारी पीयूष सिंग यांच्याकडे सोपविण्यात आला. महामंडळात पहिल्यांदाच आयएएस अधिकाऱ्याला बसविण्यात आले आहे.

या घोटाळ्यातील मुख्य आरोपी राष्ट्रवादी कॉंग्रेसचा आमदार रमेश कदम सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. महामंडळातील घोटाळा लोकमतने उघडकीस आणला होता. व्यवस्थापकीय संचालकपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेले पीयूष सिंग हे सध्या सामाजिक न्याय विभागाचे आयुक्त आहेत. १ जानेवारी २०१५ पासून यशवंत मोरे (उपसंचालक; सामाजिक न्याय) यांच्याकडे महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकपदाचा कार्यभार होता. महामंडळातील घोटाळेबाजांविरुद्ध त्यांनी कठोर कारवाई केली.

साठे महामंडळातील घोटाळ्यांप्रकरणी औरंगाबादचा अमरदीपसिंह कोहली याला आज सीआयडीने अटक केली.

साठे महामंडळाच्या माध्यमातून मातंग समाजातील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू करण्याकरता औरंगाबाद येथे जमीन खरेदी करण्यात आली होती. तेव्हा रमेश कदम हा महामंडळाचा अध्यक्ष होता. महामंडळाचे १२ कोटी रुपये अर्धा एकर जमिनीच्या खरेदीसाठी कोहलीच्या बँक खात्यात जमा करण्यात आले होते. जमिनीचा हा भाव बघून तपास यंत्रणा चक्रावली होती. तसेच, त्याच्या सतनाम ऑटोमोबाइल या फर्मला ८ कोटी रुपये महामंडळाकडून देण्यात आले, अशी माहिती आहे. हा पैसा कशासाठी देण्यात आला, हे गौडबंगाल आहे.

## अखिल भारतीय सफाई मजदूर कॉंग्रेस पुणे शहर कायदेशिर सल्लागार पदी ॲड. अशोक भोसले



पुणे : अखिल भारतीय सफाई मजदूर कॉंग्रेस पुना शहर कायदेशीर सल्लागार पदावर ॲड. अशोक शंकर भोसले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. असे पत्र अखिल भारतीय सफाई मजदूर कॉंग्रेस पुणे शहर अध्यक्ष शैलेंद्र जाधव यांनी दिले.

सफाई कर्मचाऱ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी तसेच त्यांच्या उन्नतीसाठी व त्यांचे हितासाठी आपण सामाजिक समस्या सोडवण्यासाठी कार्यरत राहाल अशी अपेक्षा पुणे शहर अध्यक्ष शैलेंद्र जाधव यांनी यावेळी व्यक्त केली.

# महाराष्ट्रातील एकही बोली भाषा मरू देणार नाही

## -मंत्री विनोद तावडे

पुणे : महाराष्ट्राचा सांस्कृतिक ठेवा जतन करुन ठेवण्याचे काम शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने सुरु असून राज्यातील एकही बोलीभाषा मरू देणार नसल्याची ग्वाही सांस्कृतिक कार्य मंत्री विनोद तावडे यांनी दिली.



येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृहात सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने जेष्ठ संगीतकार व व्हायोलिन वादक प्रभाकर जोग यांना जेष्ठ गायिका सुलोचना चव्हाण यांच्या हस्ते गुरूवारी गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यावेळी श्री. तावडे बोलत होते. या कार्यक्रमास आमदार योगेश टिळेकर, सांस्कृतिक कार्य उपसचिव संजय भोकरे, अवर सचिव शैलेश जाधव, लीला गांधी यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री. विनोद तावडे म्हणाले, महाराष्ट्राला लोककलेचा मोठा वारसा आहे. काळाच्या ओघात या लोककला तसेच विविध बोली भाषा लुप्त होत आहेत. हा समृद्ध सांस्कृतिक वारसा जतन करण्याचे काम शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने सुरु आहे. लोककलांचे व बोली भाषांचे डिजीटलायझेशन करण्याचे काम सुरु आहे. या माध्यमातून पुढच्या पिढ्यांपर्यंत हा वारसा पोहोचविला जाणार आहे. साहित्य, कला व संस्कृतीत समाजाला बदलण्याची ताकद असते. त्यामुळे या क्षेत्रात काम केलेल्या दिग्गजांचा सन्मान या पुरस्काराच्या माध्यमातून शासन करत आहे. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत सांगितीक क्षेत्रात मोठे यश मिळवणाऱ्या प्रभाकर जोग यांचे जीवन नव्या पिढीसाठी दिशादर्शक असल्याचे श्री. तावडे यांनी यावेळी सांगितले.

पुरस्काराला उत्तर देताना प्रभाकर जोग म्हणाले, अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत आयुष्यभर संगिताची सेवा निष्ठेने केली. लतादिदींच्या नावाने दिला गेलेला हा पुरस्कार याच संगीतसेवेचे फळ आहे.

सुलोचना चव्हाण म्हणाल्या, प्रभाकर जोग यांना दिला गेलेला पुरस्कार हा त्यांच्या संगीत साधनेचा केलेला गौरव आहे. योग्य व्यक्तीला हा पुरस्कार दिला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी जेष्ठ संगीतकार प्रभाकर जोग यांनी संगीतबद्ध केलेल्या गीतांचा स्वर आले जुळूनी' हा कार्यक्रम सादर करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक अजय अंबेकर यांनी शासनाच्यावतीने शास्त्रीय संगिताला प्रोत्साहन देण्यासाठी पंडित भीमसेन जोशी यांच्या नावाने पुरस्कार देण्यात येतो, तसेच विविध शिष्यवृत्या दिल्या जात असल्याची माहिती दिली. शेवटी आभार सहसंचालक मनोज सानप यांनी मानले.